जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक -८३६ दिनांक - २७/११/२०२३**

भारती विदयापीठ पोलीस स्टेशन, पुणे शहर

## ०८ दुचाकी व १२ मोबाईल फोन जप्त करून विधीसंघर्षीत बालकास घेतले ताब्यात

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन हद्दीत चोरींच्या गुन्हयांतील अज्ञात आरोपीतांचा शोध घेण्याबाबत वरीष्ठ पोलीस अधिकारी यांना तपास पथकाचे पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांना सुचना दिल्या होत्या. त्यानुसार भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनचे तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार हे **भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ७६८/२०२३,भादंवि कलम ३७९** या गुन्हयातील अज्ञात आरोपीताचा शोध घेत असताना,पोलीस अंमलदार,मितेश चोरमोले,अभिनय चौधरी,अवधुत जमदाडे,आशिष गायकवाड यांना सदरचा गुन्हा हा रेकॉर्डवरील विधीसंघर्षीत बालकाने केला असल्याची बातमी मिळाली. त्याअनुशंगाने भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनचे तपास पथकाचे पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार सदर बालकाचा शोध घेत असताना,तो कात्रज कोंढवा रोड, गोकुळनगर,गल्ली नं.४,पुणे येथे दुचाकी गाडी क्रमांक एम.एच.१२./एन.क्यु./४६७६ व १२ मोबाईल फोनसह मिळुन आल्याने त्याचेकडे त्याबाबत तपास करता,त्याने दुचाकी गाडी व मोबाईल फोन हे चोरी केल्याची कबुली दिल्याने ते जप्त केले आहेत.

सदर विधीसंघर्षीत बालकाकडे अधिक तपास करता,त्याने पुणे शहर व आजु-बाजुच्या भागातुन आणखीन दुचाकी गाडया चोरी केल्याची कबुली दिल्याने त्याने सांगितल्या ठिकाणाहुन एकुण ०८ दुचाकी गाडया जप्त केल्या आहेत. वरीलप्रमाणे त्याचेकडुन एकुण ०८ दुचाकी वाहने व १२ मोबाईल फोन असा एकुण ४,१५,०००/- रुपये किचा ऐवज जप्त केला असुन,भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनकडील एकुण ०४ गुन्हे उघडकीस आणण्यात यश आले आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त ,पश्चिम प्रादेशीक विभाग,पुणे,श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ-०२,श्रीमती.स्मार्तना पाटील, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग,पुणे,श्री.नारायण शिरगावकर यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशनकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.विनायक गायकवाड, पोलीस निरीक्षक, (गुन्हे),श्री.विजय पुराणिक, गिरीश दिघावकर, सहा.पोलीस निरीक्षक,अमोल रसाळ, पोलीस उपनिरीक्षक,धिरज गुप्ता, पोलीस अंमलदार, मितेश चोरमोले, अवधतु जमदाडे,आशिष गायकवाड, अभिनय चौधरी, सचिन सरपाले, शैलेश साठे, चेतन गोरे, महेश बारावकर, मंगेश पवार, निलेश ढमढेरे, हर्षल शिंदे, अभिजीत जाधव, निलेश खैरमोडे, धनाजी धोत्रे, सचिन गाडे, राहुल तांबे, विक्रम सावंत यांच्या पथकाने केली आहे.